<u>भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र</u>

(सकाळ)

जा.क्र. ६३४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १२/०९/२०१७

**१) सोन्याच्या मंगळसुत्राची चोरी . :–**

दिनांक ०६/०९/२०१७ चे ०७.०० ते दि. ११!०९/२०१७ चे २२.३० वा दर. यातील फिर्यादी गोपीचंद राजीराम फेंडर वय ५४ वर्ष, रा. लाखनी यांचे घरी कोणीही हजर नसतांनी यातील अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन घराचे समोरील दाराचा कोंडा तोडुन आत प्रवेश करून लाकडी आलमारीचा ताला खोलुन आलमारीतील स्टिल च्या डब्यातील १२ ग्रॅम सोन्याचा मंगळसुत्र कि. ३३,०००/रु चा माल चोरून नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ४५४,४५७,३८० भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. ऊईके पो.स्टे लाखनी हे करीत आहेत.

**२) मोटार सायकलची चोरी. :–**

दिनांक १०/०९/२०१७ चे २२.३० ते दि. ११/०९/२०१७ चे ०८.०० वा दर. यातील फिर्यादी निखीलेश देवीदास लांडगे वय २७ वर्ष रा. कस्तुरबा गांधी वार्ड अशोका हॉटेल मागे भंडारा याने त्याची मोटार सायकल पल्सर २२० निळया काळया रंगाची क्र. एमएच ३६ टि ११४५ ही रात्री घरासमोर खुल्या जागेत लॉक करून ठेवली असता, कोणीतरी अज्ञात चोराने रात्री दरम्यान कुणीही नसल्याची संधी साधुन चोरून नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. उबाडे पो.स्टे भंडारा हे करीत आहेत.

**३) रात्रीचे अधांरात अस्तित्व लपवुन दखलपात्र गुन्हा करण्याच्या उद्देशाने मिळुन आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ११/०९/२०१७ चे ०.२.०५ वा. दर. यातील आरोपी हा बेला गावात दर्गा मंदीराचे बाजुला अधांरात आपले अस्तित्व लपवुन हस्तक्षेप गुन्हा करण्याचे उद्देशाने मिळुन आल्याने सरतर्फे सफौ. टिचकुले यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे १२२ मपोका. गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सफौ. केवट पो.स्टे भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**४) अनोळखी इसमाचे प्रेत गळफास लावलेल्या स्थितीत मिळुन आल्याने मर्ग नोंद . :–**

दिनांक ११/०९/२०१७ चे १५.४० वा. पुर्वी यातील मृतक अनोळखी इसम वय अंदाजे २५ ते ३० वर्षे वयोगटातील हा शिवनी ते तिरोडी रेल्वे कुटी क्र. १०५३ /१५ वर गळफास लावलेल्या स्थितीत मृत अवस्थेत मिळुन आल्याने फिर्यादी हिराबाई रामजी साईगामा वय ५३ वर्ष रा. स्टेशन टोली देव्हाडी यांचे तोंडी रपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनी. उईके पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**५) अति दारू प्राशन करून प्रकृती बिघडल्याने औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु. . :–**

दिनांक १०/०९/२०१७ चे ११.०० ते १६.०० वा. दर. यातील मृतक शंकर दामोदधर खंडारे वय ३० वर्ष रा. वैजेश्वर वार्ड पवनी हा नेहमी दारू पाणी पिण्याच्या सवईचा असुन दि. ११/०९/१०१७ चे सकाळी १०.०० वा. दर. मृतकची अती दारू पिल्याने प्रकृती बिघडल्याने त्यास औषधोपचारा करीता मृतक चा भाऊ फिर्यादीने ग्रा.रू. पवनी येथे भरती केले, असता उपचारा दरम्यान १६.०० वा. मरण पावल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. उईके पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

६) अवैध दारू / जुगार अडयावर धाडी . :–

दिनांक ११/०९/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे जवाहरनगर, तुमसर, व सिहोरा येथे अवैध दारू/ जुगार अडयावर धाडी घालुन एकुण ०३ गुन्हे दाखल करून १९ लिटर हा.भ. दारू किंमती १४००/–रु. तसेच जुगारतुन कि. २१२ /रु असा एकुण किंमती १,६१२/–रु. माल जप्त करण्यात आला आहे.

७) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक ११/०९/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १०३ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०१ तीन सिटर वाहनांवरती १६ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ८६ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

नियत्रंण कक्ष अधीकारी
सपोनी. एच.एम. रायपुरे
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ९९७०७३२०७९

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.